LLOYDS METALS AND ENERGY LIMITED
Regd. Office and Works : Plot No. A1 & A2, MIDC Industrial Area, Ghugus 442 505, District Chandrapur (MS), Tel : 07172-285398, 07172-285103
Corporate Office : A2, 2nd Floor Madhu Estate, Pandurang Budhkar Marg, Lower Parel, Mumbai-400013, Tel : +91-22-62918111
www.lloyds.in | CIN: L40300MH1977PLC019594 | investor@lloyds.in

**Date: 25th July, 2022**

**To,**
**BSE Limited**
The Corporate Relations Department
Phiroze Jeejeebhoy Towers, Dalal Street, Mumbai - 400001

To,
Head- Listing & Compliance
**Metropolitan Stock Exchange of India Limited (MSEI)**
205 (A), 2nd floor, Piramal Agastya Corporate Park,
Kamani Junction, LBS Road, Kurla (West), Mumbai-400070

**Sub: Publication of Corrigendum to Newspaper advertisement published on 22nd July, 2022 in Chandrapur Mahasagar**

**Ref: BSE Scrip Code: 512455**
**BSE and MSEI Scrip ID: LLOYDSME**

---

Dear Sir/Madam,

Pursuant to Regulation 47 and 30 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, we hereby inform for a corrigendum of the newspaper publication published in Chandrapur Mahasagar (Marathi) on Saturday, 22nd July, 2022.

Pursuant to Regulation 47 and Regulation 30 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations 2015, we have published Notice of the 45th Annual General Meeting and E-voting information.

We have observed a typographical error from the printer end in the date of the Notice. Hence a corrigendum has been published on 22nd July, 2022 and we are submitting the same for your records.

The said corrigendum has also been uploaded on the website of the Company www.lloyds.in
We request you to kindly take note of the same and acknowledge the receipt.

Kindly take note of the same.

Thanking you,
Yours faithfully,
**For Lloyds Metals and Energy Limited**

TRUSHALI D SHAH Digitally signed by TRUSHALI D SHAH Date: 2022.07.25 11:29:57 +05'30'

**Trushali Shah**
**Company Secretary**

शनिवार, दिनांक २३ जुलै २०२२

# चंद्रपूर महासागर

पान ३

## आ.प्रतिभाताई धानोरकर जिल्हा प्रशासनासोबत ऑनफिल्ड

प्रतिनिधी

**चंद्रपूर दि.२२ :** मागील अनेक दिवसापासून जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पाऊस पडला. त्यात दोनवेळा पुराचा फटका जिल्ह्यातील वेगवेगळया भागांना बसला. जिल्ह्यातील वरोरा - भद्रावती तालुक्यात मोठ्या प्रमाणात नागरिकांचे जनजीवन विस्करीत झाले आहे. येथील मोठ्या प्रमाणात घरांची पाण्यामुळे पडझड झाली. शेतीचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. याची पाहणी करण्यासाठी आमदार प्रतिभाताई यांची जिल्हाधिकारी अजय गुल्हाने यांच्यासह जिल्हा प्रशासनासोबत ऑनफिल्ड पाहणी केली.आज भद्रावती तालुक्यातील पिपरी, पाटाळा, माणगांव, पळसगांव, कोंडा तर वरोरा तालुक्यातील करंजी येथे भेटी दिल्या.याप्रसंगी उपविभागीय अधिकारी शिंदे, वरोरा - भद्रावती येथील तहसीलदार, आरोग्य अधिकारी, कृषी अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे भद्रावती उपविभागीय अभियंता मत्ते, भद्रावती उपविभागीय अभियंता मेंढे यांच्यासह अन्य अधिकारी तसेच पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

# पूरग्रस्तांना तात्काळ आर्थिक मदत जाहीर करा - आ.विजय वडेट्टीवार

## राजुरा, गोंडपिपरी तालुक्यातील पूरग्रस्त भागाची पाहणी



प्रतिनिधी

**चंद्रपूर दि.२२ :** गेल्या पंधरवड्यात चंद्रपूर जिल्ह्यातील ग्रामीण भागात अतिवृष्टी व नदीना आलेला महापूर यामुळे हजारो हेक्टर शेती पाण्याखाली येऊन यात शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले आहे. देशाच्या अन्नदात्यावर कोसळलेले हे संकट दूर करण्यासाठी काँग्रेस पक्ष यथा शक्ती मदत करीत असून शासनाने पूरग्रस्त भागाचे वस्तुनिष्ठ पंचनामे करून तात्काळ आर्थिक मदत जाहीर करावी अशी मागणी राज्याचे माजी कॅबिनेट मंत्री ,काँग्रेस नेते आ.विजय वडेट्टीवार यांनी केली.ते राजुरा व गोंडपिपरी तालुक्यांतील पूरग्रस्त भागाची पाहणी करण्यासाठी आले असता बोलत होते.

याप्रसंगी प्रामुख्याने राजुरा विधानसभा क्षेत्र आमदार सुभाष धोटे, चंद्रपूर ग्रामीण काँग्रेस जिल्हाध्यक्ष प्रकाश देवतळे महिला, ग्रामीण जिल्हाध्यक्ष नम्रता ठेमसकर, युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष शंतनू धोटे, माजी प. स. सभापती कुंदाताई जेणेकर, गोंडपिपरी तालुका अध्यक्ष तुकाराम झाडे कार्याध्यक्ष निलेश संगमवार, महिला काँग्रेस तालुकाध्यक्ष रेखा रामटेके, माजी कृउबा उपसभापती, अशोक रेचनकर ,देविदास सातपुते, तूकेश वानोडे, सुरेश श्रीवास्कर, महेंद्र कुंनघाडकर, तथा प्रशासकीय अधिकारी व काँग्रेस कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते.याप्रसंगी पुढे बोलताना आमदार वडेट्टीवार म्हणाले की, संपूर्ण राज्यातच अतिवृष्टीमुळे पूर परिस्थिती निर्माण झाली या आसमानी संकटामुळे नद्या नाल्यांना पूर आला व शेतकऱ्यांची उभे पिके उध्वस्त झाली. अशा विदारक परिस्थितीत काँग्रेस पक्षाचे वतीने संपूर्ण पूरग्रस्त भागात पाहणी करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत व न्याय मिळवून देण्यासाठी पूरग्रस्त भागांची पाहणी सुरू असून याचा अहवाल लवकरच विधानसभेत मांडून तात्काळ आर्थिक मदत मंजूर करणे हेतू यशस्वी प्रयत्न चालू केला जात आहे असेही ते म्हणाले.

तर राजुरा विधानसभा क्षेत्रात आमदार सुभाष धोटे यांनी क्षेत्रातील जनतेला व नुकसानग्रस्त भागातील नागरिकांना दिलासा देत एक कर्तव्यदक्ष लोकप्रतिनिधी म्हणून काँग्रेस पक्ष आपल्या संपूर्ण पाठीशी ताकदिने उभा असल्याची ग्वाही याप्रसंगी दिली. यावेळी उपस्थित विविध विभागाच्या अधिकाऱ्यांना राजुरा मतदार संघात झालेल्या धानोरा, चिंचोली ,कवीटपेठ ,सिंधी, तोहगाव , विरूर स्टेशन, या पूरग्रस्त व नुकसानग्रस्त भागाचे योग्य पंचनामे करून नागरिकांना मदत करावी अशी सूचना करण्यात आल्या. तसेच पूर परिस्थिती नंतर ग्राम खेड्यांमध्ये येणा?या रोगराई व संसर्गजन्य रोगांपासून नागरिकांचा बचाव करणे हेतू प्रशासनाने पूर्व नियोजन करावे. अशाही सूचना देण्यात आल्या. यावेळी राजुरा व गोंडपिपरी तालुक्यातील बहुसंख्य काँग्रेस कार्यकर्ते व जनसामान्य नागरिक उपस्थित होते.

# काँग्रेसने नोंदवला केंद्र सरकारचा निषेध

## सोनियाजी गांधी यांच्या समर्थनार्थ आंदोलन



प्रतिनिधी

**चंद्रपूर दि.२२ :** काँग्रेसच्या अध्यक्ष सोनियाजी गांधी यांनी सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) चौकशीची नोटीस बजावली. त्यामुळे देशभरातील काँग्रेस कार्यकर्ते मोदी सरकारविरोधात आक्रमक झाले आहेत. प्रदेश कार्यालयाच्या निर्देशानुसार शुक्रवारी (ता. २२) दुपारी ४ चंद्रपूर शहर जिल्हा काँग्रेस कामिटीचे अध्यक्ष रितेश (रामू) तिवारी यांच्या नेतृत्वात गांधी चौकात आंदोलन करण्यात आले. यावेळी सोनियाजी गांधी यांच्या समर्थनार्थ घोषणाबाजी करण्यात आली. तसेच मोदी सरकारचा निषेध नोंदविण्यात आला.

मोदी सरकार सत्तेत आल्यापासून हुकुमशाही पद्धतीने कारभार करीत आहे. विरोधकांना संपविण्यासाठी केंद्रीय यंत्रणांचा गैरवापर करू लागले आहे. यातून काँग्रेसच्या अध्यक्ष सोनियाजी गांधी यांना सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) नोटीस बजावली आहे. या प्रकारामुळे देशभरातील काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये मोदी सरकारविरोधात संपात व्यक्त होत आहे. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी कार्यालयाने याविरोधात आंदोलनाची घोषणा केली आहे. त्यानुसार विभागीयस्तरावरील ईडी कार्यालयासमोर आंदोलन करून मोदी सरकारचा निषेध नोंदविण्यात आला आहे.

आता प्रत्येक जिल्हास्थानावर मोदी सरकारविरोधात आंदोलन करण्याचे निर्देश आले होते. त्यानुसार चंद्रपूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष रितेश (रामू) तिवारी यांच्या नेतृत्वात आंदोलन करण्यात आले. यावेळी काँग्रेस कार्यकर्त्यांनी मोदी सरकारविरोधात घोषणाबाजी केली. त्यानंतर जिल्हाध्यक्ष रितेश (रामू) तिवारी यांनी, लोकशाही प्रधान देशात हुकुमशाही पद्धतीने कारभार करणाऱ्या मोदी सरकारचे दिवस भरत आले आहेत. महागाईने जनता त्रस्त आहे. सर्वसामान्यांचे जगणे कठीण झाले आहे. त्यावर उपाय शोधण्याचे सोडून केंद्र सरकार केवळ विरोधकांना टार्गेट करीत केंद्रीय यंत्रणांच्या माध्यमातून त्रास देण्याचा प्रकार सुरू केला असल्याचा आरोप केला.

त्यानंतर काँग्रेसच्या अन्य पदाधिकाऱ्यांनीसुद्धा मोदी सरकारच्या भूमिकेचा तीव्र शब्दात निषेध नोंदविला. मोदी सरकारने सोनियाजी गांधी, राहुलजी गांधी यांना ईडीच्या माध्यमातून त्रास देणे बंद करावे. अन्यथा देशातील काँग्रेस कार्यकर्त्यांकडून मोदी सरकारविरोधात तीव्र आंदोलन केले जाईल, असाही इशारा यावेळी देण्यात आला. काँग्रेसचे प्रदेश महासचिव विनोद दत्तात्रय यांच्या मार्गदर्शनात झालेल्या या आंदोलनात काँग्रेसचे प्रदेश सचिव विजय नळे, काँग्रेसचे प्रदेश सचिव शिवा राव, कामगार नेते के. के. सिंग, अल्पसंख्याक विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष रमजान अली, महिला काँग्रेसच्या शहर जिल्हाध्यक्ष संगीताताई अमृतकर यांच्यासह काँग्रेसच्या सर्व फ्रंटल आर्गनायझेशनचे पदाधिकारी, कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# बल्लारपूर तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून पाहणी



प्रतिनिधी

**चंद्रपूर दि.२२ :** गत दोन आठवड्यापासून जिल्ह्यात सुरू असलेल्या पावसामुळे अनेक तालुक्यांना जबर फटका बसला. बल्लारपूर तालुक्यातसुध्दा मोठ्या प्रमाणावर शेतमालाची तसेच नागरिकांच्या मालमत्तेची हानी झाली. या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी जिल्हाधिकारी अजय गुल्हाने यांनी बल्लारपूर तालुक्यातील दुधोली, बामणी, दलेली या गावांना भेटी दिल्या.

यावेळी उपविभागीय अधिकारी दीप्ती सुर्यवंशी - पाटील, तहसीलदार संजय राईचवार, न.प. मुख्याधिकारी विजय देवळीकर, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणचे अभियंता वाढई, सार्वजनिक बांधकाम विभागाचे शाखा अभियंता वैभव जोशी, तालुका कृषी अधिकारी श्रीधर चव्हाण आदी उपस्थित होते.

जिल्हाधिका-यांनी वर्धा नदीच्या पुलाची पाहणी केल्यानंतर नगर परिषद क्षेत्रातील गणपती वॉर्ड येथील पूरग्रस्त भागाची पाहणी केली. तसेच तालुक्याच्या सर्व प्रमुख अधिका-यांची उपविभागीय कार्यालयात बैठक घेऊन पुरामुळे झालेल्या शेतमालाच्या व घराच्या नुकसानीचा आढावा घेतला. नुकसानीचे तात्काळ पंचनामे करावे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणने रस्त्यावर पडलेले खड्डे त्वरीत बुजवावे, अशा सूचना जिल्हाधिका-यांनी दिल्या.

बल्लारपूर तालुक्यात लागवडीखाली एकूण ६०८८६ हेक्टर क्षेत्र असून पुरामुळे बाधित क्षेत्र १५६४ हेक्टर आहे. पुराचा फटका तालुक्यातील १३२७ शेतक-यांना बसला आहे. आतापर्यंत नुकसानग्रस्त २०२ घरांचे तसेच काही शेतमालाचे पंचनामे करण्यात आले आहे. मात्र अजुनही काही क्षेत्रात पुराचे पाणी असल्यामुळे दोन-दिवसांत संपूर्ण पंचनामे करण्यात येतील, अशी माहिती तहसीलदार राईचवार यांनी दिली.यावेळी बामणीचे सरपंच सुभाष ताजणे, मंडळ अधिकारी शंकर खोब्रागडे, तलाठी शंकर खरूले, कृषीसेवक राहुल अहिरराव आदी उपस्थित होते.

## स्वराज्य संस्थेतील आरक्षणाने ओबीसी समाजाला मिळाला न्याय - डॉ.अंकुश आगलावे



तालुका प्रतिनिधी

**भद्रावती दि.२२ :** सर्वोच न्यायालयाने बांठीया आयोगाचा ओबीसी आरक्षण अहवाल स्वीकारून स्थानिक स्वराज्य संस्थामधील ओबीसी आरक्षाणासहित निवडणुक घेण्याचा मार्ग मोकळा झालेला असून ख-या अर्थाने ओबीसी समाजाला न्याय मिळाल्याचे प्रतिपादन डॉ. अंकुश आगलावे भाजपा ओबीसी महामंत्री वरोरा यांनी केले. भारतीय संविधानाने ओ.बी.सी ला दिलेली कलम ३४० नुसार आरक्षण मिळणे गरजेचे असून त्याशिवाय ओबीसी समाजाची प्रगती होणार नाही. ओबीसी आरक्षण संविधानाने दिलेला हक्क असल्याचे प्रसिध्दी पत्रकाव्दारे डॉ. आगलावे यांनी सांगितले. ओबीसी जागर अभियान व स्वराज्य संस्थेत ओबीसींना न्याय मिळण्याकरीता शासनदरबारी अनेकदा पाठपुरावा केला होता.सवीच्च न्यायालयातुन ओबीसी राजकीय आरक्षणाला मान्यता मिळणे हा संपूर्ण ओबीसी समाजाचा विजय असून ओबीसीला न्याय मिळाला आहे. ओबीसी समाजात शैक्षणिक, समाजिक समस्या आहे आरक्षाणाशिवाय ओबीसी समाजाची प्रगती होणार नसल्याचे मत डॉ. आगलावे यांनी व्यक्त केले.

## पुरग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य करा -डॉ.अंकुश आगलावे

तालुका प्रतिनिधी

**भद्रावती दि.२२ :** संततधार पावसामुळे शेतक-यांच्या पिकांचे अतोनात नुकसान झालेले असल्याने त्वरीत पंचनामे करून आर्थिक सहाय्य करण्याची मागणी केंद्रीय मानवाधिकार संगठनचे विदर्भ प्रदेश अध्यक्ष डॉ. अंकुश आगलावे यांनी मा. मुख्यमंत्री महोदयांना निवेदनाच्या माध्यमातुन केलेली आहे. चंद्रपूर जिल्हयात मागील दहा दिवसापासून संततधार पाऊसाने हजेरी लावली असून अनेक ठिकाणी नदी नाले ओसंडून वाहत आहे. अनेक गावांत पुर आल्याने शेतकरी बांधवांचे शेतपिकाचे अतोनात नुकसान झालेले आहे. नदी काठवरील गावांत पुराचे पाणी शिरल्याने अनेक घरे पाण्याखाली आलेली आहे. तसेच शेतातील पिक त्यात सोयाबीन, कापूस, तुरी व इतर पिकांचे फार मोठे नुकसान झालेले आहे. आधीच शेतकरी कर्जाच्या ओझ्यात असून त्यात पुराने शेतातील पिकाचे नुकसान झाल्याने शेतकरी हवालदिल झालेले आहे. प्रशासनाने पुरग्रस्त भागातील शेतकरी बांधवांना शेतातील पिकाचे नुकसान पाहता त्वरीत पंचनामे करून आर्थिक सहाय देण्याची मागणी यावेळी डॉ. आगलावे यांनी निवेदनातुन केलेली आहे.

# लॉयड्स मेटल्स अँन्ड एनर्जी लिमिटेड कंपनीत वार्षिक वैद्यकीय आरोग्य तपासणी संपन्न



प्रतिनिधी

**घुग्घूस दि.२२ :** येथील लॉयड्स मेटल्स अँन्ड एनर्जी लिमिटेड कंपनीत दिनांक १८ जुलै २०२२ सोमवार ते २२जुलै २०२२ शुक्रवार पर्यंत वार्षिक वैद्यकीय आरोग्य तपासणीचे ५ दिवस आयोजन करण्यात आले होते.

महाराष्ट्र कारखाना अधिनियम १९६३ (१८)अनुसार घुग्घुस येथील लॉयड्स मेटल्स अँन्ड एनर्जी लिमिटेड कंपनीत वार्षिक वैद्यकीय आरोग्य तपासणीचे आयोजन करण्यात आले होते.

यास कंपनीच्या सर्व कामगार व कर्मचा?यांनी मोठा प्रतिसाद दिला आहे. कामगार तथा कर्मचारी यांची आरोग्य तपासणी, सुरक्षा व आरोग्य विभाग, मुंबईचे मान्यता प्राप्त डॉ. शशांक दांडगे नागपूर यांच्या मार्फत आरोग्य तपासणी करण्यात आली जवळपास स्थायी, अस्थायी, चौकीदार व स्टाफ कर्मचारी कामगारांच्या आरोग्याची तपासणी करण्यात आली. कंपनीचे मुख्य चिकित्सक अधिकारी डॉ. रितेश वाठ व त्यांचे सहकारी धनंजय सांगुळले यांच्या मार्गदर्शनात तपासणी संपन्न झाली.

कंपनीच्या युनिटचे प्रमुख संजय कुमार, प्रकल्प प्रमुख दिनेशकुमार पाटीदार, एच.आर विभागाचे उपाध्यक्ष प्रशांत पुरी, ऑपरेशन विभागाचे उपाध्यक्ष गुणाकर शर्मा यांनी वैद्यकीय चमूचे व एच.आर विभागाचे अभिनंदन करण्यात आले.

## कृषी पायाभुत सुविधा अंतर्गत एक दिवसीय कार्यशाळा

**प्रतिनिधी/चंद्रपूर दि.२२ :** जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयाच्या वतीने शेतकरी उत्पादक कंपन्या, शेतकरी गट आदींसाठी कृषी पायाभुत सुविधा अंतर्गत एक दिवसीय कार्यशाळा नियोजन सभागृहात पार पडली. या कार्यशाळेचे उद्घाटन अतिरिक्त जिल्हाधिकारी विद्युत वरखेडकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी भाऊसाहेब ब-हाटे, नाबार्डचे जिल्हा विकास प्रबंधक तृणाल फुलझेले, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक प्रशांत धोंगळे, कृषी उपसंचालक मनोहरे उपस्थित होते.यावेळी श्रीमती वरखेडकर म्हणाल्या, कृषी विभागाने एका चांगल्या कार्यशाळेचे आयोजन केले आहे. या भागातील बहुतांश शेतकरी एकाच पिकावर अवलंबून असल्याचे निदर्शनास येते. निसर्गाच्या लहरीपणामुळे जर ते पीक व्यवस्थित हाती आले नाही, तर त्याचा फटका शेतक-यांना बसतो. त्यामुळे दुबार पीक उत्पादन घेण्यासाठी कृषी विभागाने शेतक-यांना प्रवृत्त करावे. कोरोनाच्या महामारीनंतर नागरिक आपल्या आरोग्याबाबत अतिशय जागरूक झाले आहेत.

# अन्यथा...बँकांमधून गोठवली जाईल शासकीय खाती - जिल्हाधिकारी अजय गुल्हाने



प्रतिनिधी

**चंद्रपूर दि.२२ :** जिल्ह्यातील पूर परिस्थतीमुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. पेरणी केलेल्या बियाणांसोबतच खतेसुध्दा वाहून गेली आहेत. त्यामुळे शेतक-यांसमोर दुबार पेरणीचे आव्हान आहे. अशा परिस्थितीत राष्ट्रीयकृत बँकाची पीक कर्जवाटपाची गती अतिशय संथ आहे. शेतकरी संकटात असतांना बँकांची असंवेदनशीलता ही अतिशय गंभीर बाब आहे. पुढील आठवड्यापर्यंत कर्ज वाटपाचा आकडा वाढला नाही तर बँकांमधून शासकीय खाती गोठविण्याचा निर्णय नाईलाजास्तव घ्यावा लागेल, अशा शब्दात जिल्हाधिकारी अजय गुल्हाने यांनी बँकर्सला स्पष्ट इशारा दिला.

जिल्हाधिकारी कार्यालयात खरीप हंगाम पीक कर्जवाटपाचा आढावा घेतांना ते बोलत होते. यावेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी विद्युत वरखेडकर, नाबार्डचे जिल्हा विकास प्रबंधक तृणाल फुलझेले, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक प्रशांत धोंगळे, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी भाऊसाहेब ब-हाटे याच्यासह बँकांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

पूर परिस्थितीमुळे बँकांना पुन्हा कर्जवाटपाची संधी आहे, असे सांगून जिल्हाधिकारी श्री. गुल्हाने म्हणाले, कर्जवाटपाची गती वाढविण्यासाठी विशेष शिबिर घ्यावे. याबाबतचा नियोजनबध्द आराखडा तात्काळ सादर करा. पूर परिस्थितीच्या गावातील शेतक-यांना तात्काळ कर्ज योजनेंतर्गत ५० हजार रुपयांपर्यंत कर्ज वाटप करता येते. ही योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी अग्रणी बँक व्यवस्थापकांनी गावांची यादी बँकर्सना पुरवावी. बँकांकडून किती खातेदारांना किती रक्कमेचे कर्जवाटप झाले आहे, ते कागदावर दिसणे आवश्यक आहे. नवीन खातेदारांना सुद्धा कर्ज द्या. ३१ जुलैपर्यंत जास्तीत जास्त कर्ज वाटप झाले पाहिजे, अशा सूचना जिल्हाधिका-यांनी दिल्या.

खरीप हंगाम २०२२ - २३ मध्ये जिल्ह्यासाठी ११८१ कोटींचे कर्जवाटपाचे उद्दिष्ट आहे. १ एप्रिल ते २१ जुलै २०२२ पर्यंत ८२८०३ शेतक-यांना ७११ कोटींचे कर्जवाटप करण्यात आले असून ही टक्केवारी ६१ आहे. यात चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ७९ टक्के, विदर्भ कोकण ग्रामीण बँक ७० टक्के, कॅनरा बँक ४५ टक्के, बँक ऑफ इंडिया ४३ टक्के, पंजाब नॅशनल बँक ३२ टक्के, आयडीबीआय बँक ३० टक्के, बँक ऑफ महाराष्ट्र २३ टक्के, स्टेट बँक ऑफ इंडिया २० टक्के यांचा समावेश आहे.

## घुग्घुस भाजपातर्फे नव्या राष्ट्रपतीच्या विजयाचा जल्लोष

**घुग्घूस दि.२२** गुरुवारी, येथील गांधी चौकात घुग्घुस भाजपातर्फे भाजपा जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे यांच्या नेतृत्वात नव्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या विजयाचा जल्लोष साजरा करण्यात आला.

राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत झारखंडच्या माजी राज्यपाल द्रौपदी मुर्मू यांनी देशाच्या १५ व्या राष्ट्रपती म्हणून प्रचंड मताधिक्याने विजय मिळविला.याप्रसंगी फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली तसेच आदिवासी बांधवांना व नागरिकांना लड्डू वाटप करण्यात आले.मनोगत व्यक्त करतांना भाजपा जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे म्हणाले, देशाचे राष्ट्रपती म्हणून द्रौपदी मुर्मू यांचा प्रचंड मतांनी विजय झाला आहे. हे वर्ष भारत देशाच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव म्हणून साजरा करण्यात येत आहे. या महोत्सवात तळागळातील आदिवासी महिला द्रौपदी मुर्मू ज्यांनी संपूर्ण जीवन समाजाच्या सेवेसाठी अर्पण केले. अश्या आदिवासी महिलेला देशाच्या राष्ट्रपती म्हणून बहुमान मिळवून देण्याचे काम देशाच्या नरेंद्र मोदी सरकारने केले आहे. भाजपाने नेहमी आदिवासी समाजाला न्याय दिला. परंतु आता पर्यंत काँग्रेसने कधीही आदिवासी समाजाला संधी दिली नाही. आदिवासी समाजाला न्याय देण्यासाठी पहिल्यादा देशाचे सर्वोच्च पद द्रौपदी मुर्मू यांना दिले. मी सर्व आदिवासी बांधवांचे अभिनंदन करतो व देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचेही अभिनंदन करतो व महामहिम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना शुभेच्छा देतो. यावेळी भाजयुमो प्रदेश उपाध्यक्ष विवेक बोढे, भाजपाचे निरीक्षण तांड्रा, विनोद चौधरी, अमोल थेरे, सिनू इसारप, रत्नेश सिंग, बबलू सातपुते, श्रीकांत सावे, तुलसीदास ढवस, मंदेश्वर पेंदोर, शरद गेडाम, मानस सिंग, हेमंत पाझारे, उमेश दडमल, निरंजन डंभारे, निरंजन नगराळे, गुड्डू तिवारी, विनोद जंजर्ला, दिलीप कांबळे, गणेश खुटेमाटे, कोमल ठाकरे, असगर खान, अनुप जोगी, हेमंतकुमार, पुंडलिक खनके व मोठया संख्येत भाजपा कार्यकर्ते उपस्थित होते.

**LLOYDS METALS**

LLOYDS METALS AND ENERGY LIMITED

Regd. Office and Works : Plot No. A1 & A2, MIDC Industrial Area, Ghugus 442 505, District Chandrapur (MS), Tel : 07172-285398, 07172-285103
Corporate Office : A2, 2nd Floor Madhu Estate, Pandurang Budhkar Marg, Lower Parel, Mumbai-400013, Tel : +91-22-62918111
www.lloyds.in | CIN: L40300MH1977PLC019594 | investor@lloyds.in

**शुद्धीपत्रक**

कालच्या **चंद्रपूर महासागरमध्ये पान नं. ३ वर लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडची '४५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना'** ही जाहिरात प्रकाशित झाली असून त्यामध्ये खाली **तारीख १६ जुलै २०२२** नजरचुकीने प्रकाशित झाली आहे. तरी ती **तारीख २२ जुलै २०२२** अशी वाचण्यात यावी.

४५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी दिलेल्या जाहिरातीत नमूद केलेली इतर सर्व सामग्री / माहिती अपरिवर्तित राहील. एजीएमची सूचना या शुद्धीपत्राच्या पुढे आणि संयोगाने वाचली पाहिजे.

हे शुद्धीपत्र कंपनीच्या www.lloyds.in, स्टॉक एक्सचेंजेस अर्थात www.bseindia.com आणि www.msei.in या वेबसाइटवर अपलोड केलं जाईल.

**लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेड**
सही / -
**तृशाली शाह**
**कंपनी सेक्रेटरी**